# Current Global Reviewer

Peer Reviewed Multidisciplinary International Research Journal
PEER REVIEWED & INDEXED JOURNAL

ISSN 2319-8648 | Impact Factor - 7.139 | Indexed (SJIF)

March 2020 Special Issues- 25 Vol. 1


# The Current Issues in Social Sciences in India (CISSI-2020)


Chief Editor
Mr. Arun B. Godam

Guest Chief Editor
Prof. Dr. B. D. Kokate (I/C Principal)

Dr. S. S. Undare (Vice Principal)
Dr. G. A. Mohite (Vice Principal)

Editor
Dr. R. K. Kale

Co-Editors
Dr. S. N. Akulwar
Dr. B. D. Jadhavar
Dr. S. E. Ghumatkar



Balbhim Arts, Science & Commerce College, Beed


190

**CURRENT GLOBAL REVIEWER**

Special Issue 25, Vol. 3 March 2020 | Peer Reviewed SJIF | ISSN : 2319 - 8648 Impact Factor : 7.139

# आंतरराष्ट्रीय राजकारणापुढील समकालीन आव्हान : दहशतवाद

## 'Terrorism: A Challenge before the contemporary International Politics'.

**डॉ. एस. एन. आकुलवार**
लोकप्रशासन विभाग, बलभीम महाविद्यालय, बीड.

**प्रस्तावना :**

आज समकालीन आंतरराष्ट्रीय राजकारणापुढील सर्वात मोठे आव्हान म्हणजे दहशतवाद व दहशतवादी चळवळी. मुलतत्ववादाचे मोठे रूपांतरित स्वरूप म्हणजे आज दहशतवाद होय. दहशतवाद ही संकलपना जरी संदिग्ध, जटील असली तरी तिची झळ मात्र जागतिक शांततेला आणि सुरक्षेला आव्हान ठरत आहे. ज्या महासत्तांनी प्रतिस्पर्ध्यांना जागतिक राजकारणात नामोहरम करण्यासाठी व स्वतःचे एककेंद्री वर्चस्व निर्माण करण्यासाठी दहशतवादासारखे बीज पेरले. आज त्याच बीजाचे मोठ्या वृक्षात रूपांतर होऊन त्याची पायामुळे त्याच महासत्तात रूतून बसलेले आपणास दिसते. परिणामी त्याचीच कडू फळे त्याच महासत्तांना चाखायला मिळू लागली आहे. (उदा. ११ सप्टेंबर २००१ अमेरिकेवरील हल्ला) येत्या तीन ते चार दशकापासून जागतिक राजकारणासमोर जागतिक तापमान वृद्धी (Global Warning) जागतिकीकरण (Globalization) आणि दहशतवाद (Terrorism) ह्या समस्या आव्हान ठरत आहे. जागतिक तापमान व जागतिकरण ह्यांचा परिणाम हा अतिशय संत गतीने राष्ट्रांना जाणवतो. परंतु दहशतवादासारखा प्रश्न एकाचवेळी देशाची अर्थव्यवस्था मानव संसाधन जागतिक तापमान, शांतता व सुरक्षितता या सर्वांना हादरून सोडतो. दहशतवाद ही संकल्पना सकारात्मक, व नकारात्मक स्वरूपात पुढे येते. प्रतिस्पर्धी राष्ट्राला नामोहरम करण्यासाठी हत्यार म्हणून वापरणारे या संकल्पनेला सकारात्मक तर ज्या राष्ट्रावर दहशतवादी हल्ला होतो ते यास नकारात्मक मानतात. म्हणून आंतरराष्ट्रीय शांततेसमोरील सर्वात मोठे आव्हान म्हणजे दहशवाद ठरत आहे. 'गेल्या तीन दशकापासून आंतरराष्ट्रीय पातळीवर जवळपास ३ लाखाहून अधिक निष्पाप लोक दहशतवादी हल्ल्यामुळे ठार झाले. आणि एकट्या भारता संदर्भात बोलायचे तर जम्मु काश्मिर मधील दहशतवादी कारवायामुळे ९० ते ९५ हजार पेक्षा जास्त लोक ठार झाले'[१] प्रस्तुत शोध निबंधामध्ये समकालीन दहशतवाद आंतरराष्ट्रीय राजकारणापुढील आव्हान कसा ठरला? दहशवादी कृत्ये आतापर्यंत कशी घडली? त्यामागील कारणांचा शोध घेऊन दहशतवादाचा बिमोड करण्यासाठी आंतरराष्ट्रीय स्तरावर कोणते प्रयत्न झाले आणि दहशतवादाचा बिमोड करण्यासाठी कोणत्या साधनांचा व उपायोजनांचा स्विकार करावा लागेल. यांचा उहापोह करण्याचा केला जाणार आहे.

**दहशतवाद : आंतरराष्ट्रीय राजकारणापुढील समकालीन आव्हान :**

आज समकालीन जागतिक शांततेसमोरील सर्वात मोठे आव्हान म्हणून दहशवादाचा उल्लेख केला जातो. आंतरराष्ट्रीय समुदायासमोरील सर्वात मोठा चिंतेचा विषय म्हणजे दहशवाद. भारत, रशिया, चीन, अमेरिका, जपान, मध्य आशियाई राष्ट्रे, स्पेन, इत्यादी राष्ट्रांच्या शांतता आणि सुरक्षिततेला दहशतवादाने आव्हान दिले आहे. आत्तापर्यंत दहशतवादी हिंसाचारातून जवळपास ३ लाखापर्यंत लोक मारले गेले. एकट्या जम्मु काश्मिरचा विचार केल्यास ही संख्या जवळपास ९५ हजाराहून अधिक आहे. असा या भीषण समस्यांचा क्रमपट मांडणे क्रमप्राप्त ठरते. राजकीच उद्दिष्टपूर्तीसाठी हिंसाचाराचा वापर पूर्वीपासून होत आला आहे. अनेक राज्यकर्त्यांना हिंसाचाराची पार्श्वभूमी आहे. हे विसरून चालणार नाही, तेथे ही दहशतवादाचा पद्धतशीर वापर झालेला दिसतो. विसाव्या शतकात खऱ्या अर्थाने दहशतवाद एक संघटीत शक्ती (Organized Force) म्हणून उदयाला आला. त्यास वैश्विक रूप प्राप्त झाले. विज्ञान व तंत्रज्ञानाच्या प्रगतीबरोबर दहशवादी संघटनेच्या कार्यपद्धती, साधनात अमुलाग्र बदल झाले. त्यांच्या हिंसाचारी क्षमतेत वाढ झाली असुन युरोप, आशिया, आफ्रिका, अमेरिका खंडामध्ये अनेक राष्ट्रे दहशतवादाचा शिकार झाले.

**१) पश्चिम आशियातील दहशतवाद :**

सन १९५० च्या दशकात पश्चिम आशियामध्ये स्वतंत्र पॅलिस्टाईन राष्ट्राच्या निर्मितीसाठी दहशतवादी कारवायांचा प्रारंभ झाला. सन १९४० साली पॅलिस्टाईनच्या भुमीचे विभाजन करून स्वतंत्र इस्त्रायल राष्ट्र निर्माण करण्यात आले. या पॅलिस्टाईनच्या विभाजनाला पश्चिम आशियातील मुस्लीम राष्ट्रांचा विरोध होता. इस्त्राईलचे अस्तित्व नष्ट करण्यासाठी आणि स्वतंत्र पॅलिस्टाईन राज्याच्या उभरण्यासाठी अनेक दहशतवादी संघटना उदयाला आल्या या संघटनांना अरब राष्ट्रांकडून प्रत्यक्ष-अप्रत्यक्ष आर्थिक, लष्करी व मानसिक समर्थन मिळाले. एकूण जागतिक राजकारण अशांततामय बनले.[८]

**२) युरोपमधील दहशतवाद :**

दुसऱ्या महायुद्धानंतर युरोपीय राष्ट्रांमध्ये झालेल्या राजकीय आणि आर्थिक व्यवस्थांना विरोध करण्यासाठी काही दहशतवादी संघटना उयास आल्या. युरोपातील खालावलेली आर्थिक परिस्थिती, जागतिक मंदी, राजकीय अस्थिरता यामुळे लोकांमध्ये असंतोष वाढला. या असंतोषाचे भांडवल दहशतवादी संघटनांनी केले. त्यात प्रामुख्याने इटलीमध्ये (Red Brigade) जर्मनीमध्ये Red Army या संघटना आघाडीवर होत्या. याच काळात उत्तर आयर्लंडमधील रोमन कॅथेलिक व प्रोटेस्टंट पंथियांच्या संघर्षातून दहशतवादी संघटना आकाराला आल्या. त्यामध्ये (Irish Republican Army) ही दहशतवादी संघटना महत्वाची आहे. त्यांच्या कृत्यामुळेही युरोपातील शांतता सुव्यवस्था धोक्यात आली.

**३) शीतयुद्धाचे राजकारण आणि दहशतवाद :**